महाराष्ट्र लोकसेवा आयोग

**Maharashtra Public Service Commission**

मुख्य कार्यालय : ५½ ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२. फॅक्स : २२६७३९१५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक-एडीव्ही ३११६/सीआर-६९/२०१९/तीन दिनांक:- २६ नोव्हेंबर, २०२०

**-:प्रसिध्दीपत्रक:-**

**विषय:- महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा २०२०—**
**उमेदवारांना केंद्र निवडण्याची मुभा देण्याबाबत.**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ०७ सप्टेंबर, २०२० रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा-२०२० रविवार, दिनांक १ नोव्हेंबर ,२०२० रोजी घेण्याचे निश्चित करण्यात आले होते. जाहिरातीमधील मूळ तरतुदीनुसार सदर परीक्षा मुंबईसह नागपूरऔ ,रंगाबाद व पुणे या चार महसुली विभागांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी आयोजन करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत होती व त्या अनुषंगाने कोरोना (COVID-१९) विषाणूच्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर दिनांक १५ सप्टेंबर, २०२० च्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे उमेदवारांना नविन केंद्र निवडण्याची मुभा देण्यात आली होती. तथापि आयोगामार्फत सन २०२० मध्ये आयोजित परीक्षा पुढे ढकलण्याबाबत दिनांक १३ ऑक्टोबर, २०२० रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे घोषणा करण्यात आली आहे.

**२.** कोरोना (COVID-१९) विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विषयांकित परीक्षा जाहिरातीमध्ये नमूद चार महसुली विभागांव्यतिरिक्त अन्य महसुली विभागांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी देखील आयोजित करण्याबाबत लोकप्रतिनिधींसह काही उमेदवारांकडून मागणी करण्यात आली होती. सदर मागणीचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन तसेच परीक्षा पुढे ढकलल्यामुळे उपलब्ध झालेला कालावधी लक्षात घेता विषयांकित महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा-२०२० या परीक्षेचे आयोजन जाहिरातीमध्ये नमूद चार महसुली विभागांच्या मुख्यालयांव्यतिरिक्त नाशिक व अमरावती या महसुली विभागांच्या मुख्यालयांच्या ठिकाणी देखील करण्याचा सकारात्मक निर्णय आयोगाने घेतला आहे. या निर्णयास अनुसरुन आयोगामार्फत आयोजित विषयांकित परीक्षेकरीता अर्ज सादर केलेल्या **सर्व** उमेदवारांना मुंबई,पुणे ,औरंगाबाद ,नागपूर ,नाशिक व अमरावती यापैकी त्यांच्या पसंतीचे केंद्र निवडण्याची मुभा देण्यात येत आहे.

**३.** आयोगाच्या वरील निर्णयाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल:-

(१) दिनांक १५ सप्टेंबर, २०२० रोजीच्या प्रसिध्दीपत्रकास अनुसरुन उमेदवाराने निवडलेले केंद्र रदद करण्यात येत आहे.

(२) आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीमधील उमेदवारांच्या प्रोफाईलदवारे **दिनांक २६ नोव्हेंबर, २०२० रोजी दुपारी १४.०० ते दिनांक ०७ डिसेंबर, २०२० रोजी २३.५९** वाजेपर्यंत उमेदवारांना त्यांच्या पसंतीचे केंद्र निवडण्याची संधी पुन्हा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

(३) संबंधित केंद्रांच्या ठिकाणी शाळा / महाविद्यालयाच्या स्थानिक पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेनुसार प्रत्येक केंद्रावर उमेदवारांना प्रवेश द्यावयाची कमाल क्षमता निश्चित करण्यात येत आहे. सदर क्षमता लक्षात घेऊन "प्रथम येणा-यास प्राधान्य" (First Apply-First Allot) या तत्वानुसार केंद्र निवडण्याची मुभा असेल. संबंधित केंद्राची कमाल क्षमता संपुष्टात आल्यानंतर त्या केंद्राची निवड उमेदवारांना करता येणार नाही.

(४) विहित कालावधीत केंद्राची निवड न करणा-या उमेदवारांना प्रस्तुत परीक्षेच्या त्यांच्या अर्जामधील कायमस्वरुपी रहिवासाच्या पत्त्यानुसार (Permanent Address) त्यांच्या महसुली विभागाच्या मुख्यालयाच्या केंद्रावर प्रवेश देण्यात येईल.

(५) एखादया केंद्राची क्षमता संपुष्टात आल्यानंतर केंद्राची निवड न करणा-या अथवा निवड करु न शकलेल्या उमेदवाराला आयोगाकडून उपलब्ध करुन देण्यात येणा-या केंद्रावर परीक्षेसाठी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

(६) नव्याने केंद्र निवडण्याकरीता सर्व उमेदवारांना त्यांच्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल दूरध्वनी क्रमांकावर लघुसंदेशादवारे (एसएमएस) कळविण्यात येईल.

**४.** वरील व्यवस्थेप्रमाणे निवडण्यात आलेले केंद्र बदलण्याची विनंती यापुढे कोणत्याही कारणास्तव, कोणत्याही सबबीखाली मान्य करता येणार नाही.

सह सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग